लघु पाटबंधारे तलाव बोरीपाडा (गोलदरी) ता. त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक या कामाला आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत लहान पाटबंधारे योजना (राज्यस्तर) मधून (४७०२ ७७२१) निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ /प्र.क्र.२३ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - १५-०३-२०१८.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७..

२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र. ९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७ व दि.०६.०२.२०१८.

३) मृद व जलसंधारण विभागाची नस्ती क्र. मजम- २०१७ / प्र.क्र.२०७/ जल-०३

**शासन निर्णय :-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र. टी-६, ४७०२ लहान पांटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०१)(१८)राज्य एकत्रित निधी अंतर्गत लहान पाटबंधारे योजना, राज्यस्तर योजना, ( ४७०२ ७७२१ ) ५३- मोठी बांधकामे या योजनेकरीता सन २०१७-१८ करीता एकुण रु. ३००.०० लाख तरतूद अर्थसंकल्पित आहे

२. मृद व जलसंधारण विभागाच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावास अनुसरून उपरोक्त लेखाशिर्षाखाली वित्त विभागाच्या दि.६/०२/२०१८ च्या परीपत्रकानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील उपलब्ध रु.२४०.०० लाख निधीपैकी रु. १००.०० लक्ष ( अक्षरी रुपये एक कोटी फक्त) इतका निधी बोरीपाडा (गोलदरी) ता. त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक येथील १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघू पाटबंधारे प्रकल्पाकरीता नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रकरणी नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, नाशिक तसेच मृद व जलसंधारण विभागयांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी तसेच सदर योजनेचा फायदा प्राधान्याने अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना होईल याची दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ ,व २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803141354320124 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.15 16:53:23 +05'30'

**रविंद्र दि. औटे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. प्रधान सचिव, मृदा व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०.मृदा व जलसंधारण विभाग, जल-०३, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, कार्यासन- २ / कार्यासन-०५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.